प्रेस

जावक क्रं - ३२५५/२०१८
समर्थ पोलीस स्टेशन,पुणे शहर
दि.१६/०७/२०१८

प्रति,

मा.जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर.

**रिपोर्ट** :- पी.आर.शिकलगार,सहाय्यक पोलीस निरीक्षक,समर्थ पोलीस स्टेशन,पुणे शहर.

**विषय** :- पिडीत मुलीचा शोध होणेकामी तिची माहिती सर्व वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द होणेबाबत.

**महोदय,**

समर्थ पोलीस स्टेशन गु.रजि.नं.१३१/१८ भा.दं.वि.कलम ३६३ मधील तक्रारदार नामे नंदु युरप्पा कांबळे वय -३४ वर्षे धंदा बिगारी काम रा.वांगी रोड हाडुक रोड कॅनॉल जवळ,जिल्हा परभणी सध्या रा.मुंब्रा रेल्वे स्टेशन समोरील दर्गाचे फुटपाथवर,मुब्रा मंबई (पश्चिम) हे त्यांच्या कुटुंबीयासोबत पालखी सोहळया निमीत्त नानापेठ येथे आले होते.दि.०८/०७/२०१८ रोजी सायंकाळी ०५/०० वा.चे सुमारास श्रीराम मंदीर ट्रस्ट,माहेश्वरी समाज,नानापेठ,पुणे येथे खिचडी वाटपाचा कार्यक्रम असल्याने त्यांची पत्नी वर्षा हिने मुलगी मोनाली वय -०५ वर्षे हिस कमरेवरुन खाली ठेउन ते दोघे खिचडी घेण्यासाठी गेले असता त्याची मुलगी नामे मोनाली वय - ५ वर्षे हिला त्याचे कायदेशिर रखवालीतुन कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन अज्ञात कारणाकरीता पळवुन नेले आहे.म्हणुन अज्ञात इसमाविरुध्द वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.तरी मुलगी मोनाली हिचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे...



नाव- मोनाली नंदु कांबळे वय -०५ वर्षे,रंगाने सावळी,उंची अडीच फुल,केस बारीक व कुरळे,चेहरा गोल,डोळे काळे पांढरे,नाक बसके,बांधा मध्यम,नेसनीस पांढ-या रंगाचा फ्रॉक त्यावर करड्या रंगाचे बारीक बारीक टिपके,कमरेच्या उजव्या बाजुस ५ काळे टिपके डाव्या पायाच्या तळपायाला फोड स्वताचे नाव मोनाली असे सांगते

तरी उपरोक्त वर्णनाच्या अल्पवयीन पिडीत मुलीचा शोध होणेकामी तिची माहिती सर्व वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द होणेस विनंती आहे.